**ठळक बातम्या**

- ईद उल फित्र  अर्थात रमजान ईद सणाचा देशभरात उत्साह

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर

- मुगल शासक औरंगजेबाची कबर हे संरक्षित स्मारक आहे, मात्र त्याचं उदात्तीकरण करू दिलं जाणार नाही असं महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचं स्पष्ट प्रतिपादन

- छत्तीसगडमध्ये, दंतेवाडा जिल्ह्यात सुरक्षा दलांबरोबरच्या चकमकीत एक महिला माओवादी ठार

**आणि**

- आयपीएल क्रिकेटमधे  मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यातला सामना मुंबईच्या वानखेडे मैदानावर आज रंगणार

**<><><><><>**

ईद उल फित्र  अर्थात रमजान ईद हा सण आज देशभरात उत्साहात  साजरा केला जात आहे. पवित्र रमजान महिन्यानंतर येणाऱ्या या सणानिमित्त  आज ठिकठिकाणच्या  मशिदी आणि ईदगाहमधे सामूहिक नमाज अदा करण्यात आली. मुस्लीम समाज एकमेकांना भेटून शुभेच्छा, मिठाई आणि भेटवस्तू  देत ईदचा आनंद साजरा करत आहेत.

**राजधानी दिल्ली**मधे जामा मशीद, फतेहपुरी मशीद आणि शाही मशिदीत ईदची नमाज अदा करण्यात आली. **महाराष्ट्रात** मुंबईसह राज्यभरात ईद साजरी केली जात आहे. भाविक एकमेकांना भेटून ईदच्या शुभेच्छा देत आहेत, तसंच सामूहिक नमाज अदा करत आहेत.

**तमिळनाडू**मधे ईदची नमाज अदा करण्यासाठी राज्यभरातल्या मशिदीत आज प्रचंड गर्दी झाली. **आंध्र प्रदेश**मधल्या विजयवाडा इथल्या इंदिरा गांधी स्टेडियमवर भाविकांनी मोठ्या संख्येने एकत्र येत नमाज अदा केली. **तेलंगणा**त हैदराबादमधल्या मीर आलम ईदगाहमधे हजारो भाविकांनी सामुहिक नमाज अदा केली. तसंच एकमेकांना शुभेच्छा दिल्या. **उत्तर प्रदेशात** ईदच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. लखनौसह राज्यातल्या विविध ईदगाह आणि मशिदीत भाविक नमाज अदा करत आहेत. **राजस्थान**मधे आज सकाळपासूनच भाविक मोठ्या भक्तिभावाने नमाज अदा करत आहेत. **काश्मीर**मधे हजरतबल दर्गाहमधे भाविकांनी प्रार्थनेसाठी मोठी गर्दी केली. मात्र जामा मशिदीत नमाज अदा करण्याची परवानगी नाकारण्यात आली आहे. दोन्ही ठिकाणी पोलिस बंदोबस्त मोठ्या प्रमाणात तैनात केला आहे.

**<><><><><>**

देशभरात आज ईद-उल-फित्र उत्साहाने साजरी करण्यात येत आहे. रमजान ईदनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, तसंच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ईद निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

हा सण बंधुता, सहकार्य आणि करुणेच्या भावनेला बळकटी देतो असं राष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे की, सांस्कृतिक विविधतेतून मिळालेल्या शक्तीमधून एकजुटीनं राष्ट्राला पुढे नेण्यासाठी हा सण प्रेरित करेल.

आशा, सामंजस्य आणि करुणा या भावना ईद निमित्ताने दृढमूल होतील, अशी कामना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा संदेशात व्यक्त केली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ही ईद निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. राष्ट्रपती आज संध्याकाळी मुंबईत येणार असून उद्या भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ९० व्या वर्धापन दिन सोहळ्याच्या समारोप समारंभाला त्या उपस्थित राहणार आहेत.

<><><><><>

महाराष्ट्रात राज्य शासनाच्या  सर्व विभागांनी राज्य मंत्रिमंडळासमोर नवा प्रस्ताव ठेवताना खर्चात अर्थसंकल्पातल्या तरतुदीपेक्षा जास्त झालेल्या वाढीचा स्पष्ट उल्लेख करण्याचे निर्देश राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी दिले आहेत.  नवीन प्रस्तावात खर्चात झालेली वाढ यामुळे स्पष्टपणे लक्षात येईल, तसंच त्या वाढीसाठी संबंधित विभागाला जबाबदार धरता येणार आहे. वाढलेला खर्च मूळ तरतुदीपेक्षा किती जास्त आहे हे नमूद केल्याशिवाय प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवू नये असे निर्देश सौनिक यांनी दिले आहेत. राजकोषीय तूटीला आवर घालणं हा याचा हेतू असून हा निर्णय एका व्यापक धोरणाचा भाग आहे, असं एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने सांगितलं.

<><><><><>

मुगल शासक औरंगजेबाची कबर हे संरक्षित स्मारक आहे, मात्र त्याचं उदात्तीकरण करू दिलं जाणार नाही, असं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं. ते आज नागपुरात वार्ताहरांशी बोलत होते. कुणाला आवडो की न आवडो औरंगजेबाची कबर हे संरक्षित स्मारक आहे, असं फडणवीस म्हणाले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या खुलताबाद इथली औरंगजेबाची कबर काढून

टाकण्याची मागणी गेले काही दिवस हिंदुत्त्ववादी संघटना करत होत्या. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांचं हे वक्तव्य महत्त्वाचं मानलं जात आहे.

<><><><><>

छत्तीसगडमध्ये, दंतेवाडा जिल्ह्यात सुरक्षा दलांचं संयुक्त पथक आणि माओवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत एक महिला माओवादी ठार झाली आहे. सुरक्षा दलांचं एक संयुक्त पथक बिजापूर-दंतेवाडा जिल्ह्याच्या सीमेवरच्या जंगलात नक्षलविरोधी कारवाईसाठी गेलं असताना आज सकाळी ही चकमक झाली. घटनास्थळावरून एक रायफल आणि काही स्फोटकं जप्त करण्यात आली असून या परिसरात शोध मोहीम सुरू आहे.

<><><><><>

देशातल्या खासगी, बिगरअल्पसंख्यक शैक्षणिक संस्थांमध्येही अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठी राखीव जागा ठेवाव्यात यासंदर्भात सरकारनं कायदा आणावा, अशी मागणी काँग्रेसनं केली आहे. या प्रवर्गातल्या नागरिकांच्या प्रगतीसाठी विशेष कायदे करायचा अधिकार सरकारला देणाऱ्या राज्यघटनेतल्या कलम १५, पोटकलम १५च्या अंमलबजावणीसाठी शिक्षण, महिला, युवा आणि क्रीडा क्षेत्रातल्या संसदीय समितीनंही नव्या कायद्याची शिफारस केल्याचं काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

अलाहाबाद उच्च न्यायालयाने प्रशासकीय फेरबदलांतर्गत ५८२ न्यायिक अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. यात २३६ अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायाधीश, वरिष्ठ विभागातले २०७ दिवाणी न्यायाधीश आणि कनिष्ठ विभागातले १३९ दिवाणी न्यायाधीश यांचा समावेश आहे. कानपूर भागात सर्वाधिक बदल्या झाल्या असून १३ न्यायाधीशांची पुनर्नियुक्ती करण्यात आली आहे. तर अलिगढ इथल्या ११ आणि बरेलीच्या पाच न्यायाधीशांचीही बदली करण्यात आली आहे.

उच्च न्यायालयाचे सहनिबंधक सतीश कुमार पुष्कर यांनी काल संध्याकाळी हे आदेश दिले असून बदली झालेल्या सर्व न्यायाधीशांना ताबडतोब नवीन पदांवर रुजू व्हायचे निर्देशही दिले आहेत.

**<><><><><>**

मुंबई विमानतळावर सीमाशुल्क विभागाने बँकॉकवरून येणाऱ्या एका प्रवाशाकडून ३ किलो गांजा जप्त केला आहे. आरोपी केरळचा रहिवासी असून हा गांजा त्याला बेंगळुरूमध्ये मुख्य तस्कराकडे पोहोचवायचा होता. त्या बदल्यात त्याला प्रतिग्रॅम दीड लाख रुपये मिळणार असल्याचं त्याने चौकशीत कबूल केलं.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबईत वानखेडे मैदानावर मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात सामना होणार आहे. संध्याकाळी साडेसातवाजता सामना सुरु होईल.

काल विशाखापट्टणम इथं झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सनं सनरायजर्स हैदराबादवर ७ गडी आणि २४ चेंडू राखून विजय मिळवला. तर राजस्थान रॉयल्स आणि चेन्नई सुपर किंग्स या संघांदरम्यान झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सनं चेन्नई सुपर किंग्सचा ६ धावांनी पराभव केला.

**<><><><><>**

जॉर्डनची राजधानी अम्मान इथं झालेल्या आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेच्या फ्रीस्टाइल प्रकारात दीपक पुनिया आणि उदित यांनी काल रौप्य पदके पटकावली. दिनेशने १२५ किलो वजनी गटात तुर्कमेनिस्तानच्या झियामुहम्मत सपारोव्हला नमवत कांस्यपदक जिंकले. या स्पर्धेत भारताने दहा पदके जिंकली आहेत. यामध्ये एक सुवर्ण, तीन रौप्य आणि सहा कांस्यपदकांचा समावेश आहे.

**<><><><><>**

कॅनडातील ओंटारियोमध्ये बर्फवृष्टीमुळे लाखांहून अधिक लोकांना वीजपुरवठा खंडित होण्याच्या समस्येचा सामना करावा लागत आहे. कॅनडा सरकारच्या पर्यावरण विभागाने ओटावा, क्यूबेक आणि ओंटारियोच्या काही भागात पाऊस आणि गडगडाटी वादळाचा इशारा दिलं आहे. उद्यापासून वीजपुरवठा पूर्ववत होण्याची अपेक्षा आहे. वादळामुळे ओंटारियोमधील ओरिलिया शहरात आपत्कालीन स्थिती जाहीर करण्यात आली आहे.

**<><><><><>**

भारतीय हवामानशास्त्र विभागाने पुढील ४ दिवसांत महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये वादळ, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज वर्तवला आहे. हवामान संस्थेने १ ते ३ एप्रिल दरम्यान पश्चिम मध्य प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, केरळ, माहे, किनारी आंध्र प्रदेश, यानम, रायलसीमा, तेलंगणा आणि कर्नाटक येथेही अशीच परिस्थिती राहण्याची शक्यता वर्तवली आहे.

**//<><><><><>//**